गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २०३ वा ● बुधवार १३ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 203 | Date : 13/12/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## देशात प्रथम क्रमांकाचे राज्य बनवण्याला प्राधान्य : मुख्यमंत्री

नागपूर : कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग, व्यापार, पायाभूत सोयीसुविधा आदी सर्वांगीण विकासाच्या बाबतीत लोकाभिमुख कारभारातून राज्याला देशात प्रथम क्रमांकाचे बनविण्याला शासनाचे प्राधान्य असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे आय बी एन १८ वृत्तवाहिनीच्या 'अजेंडा सशक्त महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात दिली.वृत्तवाहिनीचे संपादक आशुतोष पाटील यांनी घेतलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलखुलास उत्तरे दिली.राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधा उभारणीवर राज्य शासनाचा भर असून, उद्योग, व्यापारवाढीवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. शासनाने सुरुवातीलाच दावोस येथे जावून १ लाख ३७



हजार कोटीवर विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत. भविष्यातही अनेक कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले जातील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

राज्य शासनाने महात्मा जोतीराव फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा ५ लाख रुपयांवर केली असून, कॅशलेस सुविधा देणे हा पुढील टप्पा असल्याचे सांगत राज्यातील गरीब जनतेला घराजवळच आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना उपक्रम सुरु केला आहे. आतापर्यंत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून मोठी रक्कम वितरित करून अनेक रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात राज्य शासनाचे उत्तम काम सुरु असन, राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांची उभारणी करण्यात येत आहे. देशात सर्वाधिक प्रकल्प राज्यात सुरु असल्याचे सांगून, नागपूर ते मुंबई हा हिंदू हृदयसम्राट । **पान २ वर**

## शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण सुनावणीच्या वेळापत्रकात पुन्हा बदल!

मुंबई/वृत्तसंस्था : शिवसेना आमदार अपात्रता सुनावणी प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे आणि ठाकरे गटाच्या संमतीने वेळापत्रकात पुन्हा एकदा बदल केला आहे. आता, शनिवारी आणि रविवारी होणारी सुनावणी दोन्ही गटाच्या संमतीने रद्द करण्यात आली आहे. आता, अंतिम सुनावणी १८ डिसेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे.

आज, दोन्ही गटांकडून उलट तपासणी साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सोमवारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर



यांनी आज, १२ डिसेंबर रोजीच उलट तपासणी संपवण्याचे निर्देश दिले होते. आज, १२ डिसेंबर रोजी शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे आणि शेवटी भरत गोगावले यांची उलट साक्ष नोंदवण्यात आली. आता, १३ डिसेंबरपासून ते तीन दिवस अर्थात १५ डिसेंबरपर्यंत लेखी युक्तिवाद होणार आहे. त्यानंतर अंतिम सुनावणी सोमवारी १८ डिसेंबरपासून सुरू होणार. अंतिम सुनावणी १८ ते २० डिसेंबर या तीन दिवसांत पूर्ण होणार आहे. उद्यापासून पुढील तीन दिवसात लेखी उत्तर सादर करावे लागणार आहे. शनिवारी आणि रविवारी होणरी सुनावणी दोन्ही गटाच्या संमतीने रद्द करण्यात आली आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले की, विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे. सातत्याने सकाळ आणि संध्याकाळी जवळपास दररोज सात तास सुनावणी । **पान २ वर**

## तरुणांनी मांडलेल्या प्रश्नाची दखल घेतली नाही तर ते आपली शक्ती दाखवल्याशिवाय राहणार नाहीत; शरद पवारांचा इशारा

नागपूर: रोहित पवारांनी युवा वर्गाला घेऊन त्यांच्या समस्या सरकारसमोर मांडल्या, त्यासाठी त्यांनी युवा संघर्ष यात्रा काढली, आता तरुणांच्या प्रश्नांची दखल जर सरकारने घेतला नाही तर ते युवावर्ग आपली शक्ती दाखवल्याशिवाय राहणार नाही असा इशारा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. तसेच मराठा आणि धनगर आरक्षणाबद्दल तरूणांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, त्यामुळे त्यांची दखल सरकारने घ्यावी असंही ते म्हणाले. रोहित पवारांच्या युवा संघर्ष यात्रेचा आज नागपुरात समारोप झाला. त्यानिमित्ताने आज त्या ठिकाणी शरद पवारांनी जाहीर सभेला संबोधित केलं.शरद पवार म्हणाले की, रोहित




पवारांनी संघर्ष यात्रा काढली, त्या दरम्यान त्यांनी दोन लाख लोकांशी थेट संपर्क साधला. १० जिल्ह्यातून ३२ दिवसांच्या या प्रवासात त्यांनी सर्वसामान्यांशी संवाद साधला आणि त्यांनी या यात्रेचा शेवट केला. आता त्यांच्या मागण्यांची दखल राज्य सरकारने घेणं गरजेचं आहे.

ही यात्रा म्हणजे शक्तिप्रदर्शन नाही. आम्ही लोकांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ही यात्रा काढली. सरकार कोणाचंही असो, शेतकरी, तरुण, सामान्य नागरिकांच्या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे. आज आम्ही जनतेच्या मागणीचे पत्र मुख्यमंत्री कार्यालयात दिले आहे. मला इथे । **पान २ वर**

## विधिमंडळातील दोन दिवसांच्या सर्वंकष चर्चेनंतर ५५ हजार ५२० कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर

### पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधानिर्मिती, विकासाची संधी सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे प्रयत्न : उपमुख्यमंत्री अजित पवार

नागपूर, दि. १२ :- उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सादर केलेल्या ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांची निर्मिती, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची संधी पोहचवण्यात येणार आहे. केंद्राच्या योजनांच्या मॅचिंग ग्रॅन्टचाही पुरवणी मागण्यांमध्ये समावेश असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या उत्तरात सांगितले. पुरवणी मागण्यांमुळे वाढलेली महसुली व राजकोषीय तूट वर्षअखेरीस उत्पन्नाचे स्त्रोत वाढवून




आणि प्रत्यक्ष खर्चावर नियंत्रण ठेवून कमी करण्यात येईल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

**प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४८ हजार ३८४ कोटी ६६ लाख रुपये** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधीमंडळात पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. त्यावर काल आणि आज सभागृहात सविस्तर चर्चा झाली. अनेक सदस्यांनी त्यावर आपले मत मांडले. विधान परिषदेत चर्चेला उत्तर देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, स्थूल पुरवणी माग़ण्या ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख रुपयांच्या दिसत असल्या तरी प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४८ हजार ३८४ कोटी ६६ लाख रुपये एवढाच आहे. सर्व विभागांच्या मिळून ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख। **पान २ वर**

## राज्य मागासवर्ग आयोगाची पुनर्रचना, अध्यक्षपदी सुनील शुक्रेंची नियुक्ती, तीन सदस्यांचीही नेमणूक

नागपूर : राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायाधीश सुनील शुक्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष आनंद निरगुडे यांनी राजीनामा दिल्यानंतर राज्य सरकारकडून शुक्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शुक्रे यांच्याशिवाय तीन सदस्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे. सदस्य पदी ओम प्रकाश जाधव, मारुती शिंगारे , मच्छिंद्रनाथ तांबे यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सुनील बाळकृष्ण शुक्रे मागसवर्ग आयोगाचे अध्यक्ष : मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष म्हणून सुनील बाळकृष्ण शुक्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आनद वसंत निरगुडे यांनी राजीनामा दिला होता. त्यांच्या जाही सुनील शुक्रे यांची निवड करण्यात आली आहे. सुनील शुक्रे यांनी गेली दहा वर्षे मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले असून या वर्षी २४ ऑक्टोबरला ते सेवानिवृत्त झालेत. मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत चर्चा करून त्यांनी उपोषण मागे घ्यावे यासाठी जे निवृत्त । **पान २ वर**

## सर्व संबंधित शासकीय विभागांनी अल्पसंख्याकांसाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी

### निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे

सोलापूर/प्रतिनिधीः प्रधानमंत्री १५ कलमी कार्यक्रमा अंतर्गत अल्पसंख्याकांसाठी असलेल्या विविध योजनांची संबंधित विभागांनी प्रभावी अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांना विहित वेळेत लाभ मिळवून दिला पाहिजे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित प्रधानमंत्री १५ कलमी कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी श्री. कांबळे मार्गदर्शन करत होते.



यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखरडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. बी. काटकर, कौशल्य विभागाचे सहाय्यक आयुक्त हनुमंत नलावडे, शासकीय पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. उपाध्य यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी कांबळे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागांनी । **पान २ वर**




## एकलव्य मॉडेल निवासी शाळेच्या प्रवेशासाठी १९ फेब्रुवारी पर्यंत अर्ज करावेत

सोलापूर/प्रतिनिधीः आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात कार्यान्वित असलेल्या इंग्रजी माध्यमांच्या एकलव्य मॉडेल निवासी शाळेमध्ये इयत्ता ६ वी च्या वर्गात नविन प्रवेशासाठी तसेच इयत्ता ७ ते ९ वी च्या वर्गातील अनुषेश भरून काढण्यासाठी अनुसूचित आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश द्यावयाचा आहे. अनुसूचित आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांनी दि.१९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत प्रवेशासाठी अर्ज सादर करावेत असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड यांनी केले आहे. एकलव्य मॉडेल निवासी शाळेमध्ये प्रतिवर्षी इयत्ता ६ वीच्या वर्गामध्ये ३० मुली व ३० मुले असे एकूण ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. तसेच इयत्ता ७ वी ते ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या रिक्त जागांचा अनुशेष भरून काढण्यात येतो. अनु.जमातीच्या दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के जागा तसेच आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एकुण ५ जागा आरक्षित राहतील. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एकलव्य मॉडेल निवासी शाळेमधील इयत्ता ६ वी च्या वर्गात नविन प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व इयत्ता ७ वी ते ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या अनुशेष भरून काढण्यासाठी तसेच सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी , इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसुचित आदिम जमातीच्या विद्यार्थांसाठी रविवार दि.२५ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा ते दुपारी १.०० या वेळेत व इ.६ वी व इ.७ वी ते इ.९ वी साठी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वा. या वेळेत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा होटगी, ता दक्षिण सोलापूर जि. सोलापूर या आश्रमशाळेत परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. शासकीय व अनुदानित आश्रमशाळेसह जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अनुसूचित आदिम जमातीचे विद्यार्थी दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत या कार्यालयास प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. विहीत नमुन्यातील अर्ज प्रकल्प कार्यालयाकडुन प्राप्त करून घ्यावेत. अनुसुचित आदिम जमातीच्या ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६ लाखांपेक्षा अधिक आहे, अशा पालकांच्या पाल्यांना सदर परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही. आधिक माहितीसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर दक्षिण सोलापूर तहसिल कार्यालयाच्या । **पान २ वर**



# संपादकीय

## चांगले योगदान देऊ शकतील.

जगातील दहा टक्के लोकसंख्या म्हणजेच सुमारे ६७ कोटी लोक या ना त्या कारणाने दिव्यांग आहेत. महाराष्ट्रात तीन कोटी दिव्यांग बांधव आहेत. भारताच्या बाबतीत विचार करायचा झाल्यास २०१४ साली देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी झाले. त्यानंतर दिव्यांगांना 'अच्छे दिन' येतील, असा आशेचा किरण चमकला. अपेक्षेप्रमाणे पंतप्रधानांनी दिव्यांग कल्याणासाठी प्रयत्न केलेदेखील. विशेष व्यक्तींना अपंग या शब्दाऐवजी दिव्यांग अशी ओळख दिली. २०१६ मध्ये देशात मोदी सरकारने नवीन दिव्यांग हक्क कायदा मंजूर केला. देशात आणि राज्यात दिव्यांगांसाठी असलेल्या जुन्या योजना आणि काही नव्या योजनांची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानुसार अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिव्यांग नोंदणी होऊ लागली. २०१६ आधी देशात दिव्यांग या प्रवर्गात केवळ सहाच प्रवर्ग होते, परंतु मोदी सरकारने नवीन २१ प्रकारचे दिव्यांग प्रवर्ग तयार केले. त्यामुळे हे सरकार दिव्यांगांचे कल्याण करणारे सरकार आहे, असा विचार रुढ होत असतानाच स्मार्ट सिटीची संकल्पना पंतप्रधानांनी देशभर आणली. यात शहरांमधील पसारा कमी करून ते स्मार्ट करण्याकडे कल होता. 'स्मार्ट सिटी' प्रस्तावात अनेक विधायक बाबींचा समावेश केला. परंतु, शहरांना चकाचक करण्याच्या नादात दिव्यांगांकडे पूर्णत: दुर्लक्ष झाले. स्मार्ट सिटी योजनेत दिव्यांग नागरिकांचा ज्यात अंध, अस्थिव्यंगबाधित, मूकबधिर, गतिमंद व्यक्ती आणि विद्यार्थ्यांसाठी कुठलेही धोरण आखले नाही. त्यामुळे दिव्यांग बांधवांचा या धोरणाने हिरमोडच केला. आधीच परिस्थितीने पिचलेले हे बांधव सरकारी धोरणामुळे अधिक व्यथित झाले. दिव्यांग व्यक्ती अनेक योजनांपासून वंचित राहिलेल्या आहेत. आता शहरे स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत असताना महापालिकेने दिव्यांगांसाठी योग्य प्रकारे योजना राबविणे गरजेचे आहे. केवळ योजना जाहीर करून भागणार नाही, तर योजनांची नेटकी अंमलबजावणी करावी लागेल. शहरे स्मार्ट होत असताना त्यात सक्षम झालेल्या दिव्यांग नागरिकांनाही सहभागी करून घेतल्यास दिव्यांग नागरिकांना शहरांविषयी अधिक आत्मीयता वाटेल. त्यातूनच ते भविष्यात विकसित शहरांसाठी त्यांचेही चांगले योगदान देऊ शकतील.

# मागासवर्गीय व दिव्यांगांना स्वीय निधीचा आधार

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून स्वीय निधीमधून विविध योजना राबविण्यात येतात. यामध्ये मागासवर्गीयांकरिता राखीव २० टक्के स्वीय निधीतून घरकुल योजना, दिव्यांगासाठी राखीव ५% निधीतून दिव्यांग घरकुल योजना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिव्यांग कल्याण निधीतून स्वयंचलित तीन चाकी सायकल योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी पंचायत समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. जाणून घेऊया या योजनांविषयी ..

जिल्हा परिषद सांगलीकडून स्वीय निधीमधून सन २०२३-२४ मध्ये राबविण्यात येणाऱ्या योजना पुढीलप्रमाणे (१) मागासवर्गीय व्यक्तींना घरकुल योजना -२०२३-२४ - ग्रामीण भागातील मागासवर्गीय व्यक्तींना (पुरूष व महिला ) (अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज. व नवबौध्द) घरबांधणीसाठी आर्थिक सहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**लाभार्थी पात्रता निकष** अर्जदार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, नवबौध्द या प्रवर्गातील असावा/असावी. अर्जदाराच्या कुटुंबाचे मागील आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न एक लाख रूपये च्या आत असावे (कुटुंब : एकाच शिधापत्रिकेवरील नमूद लोकांचा गट). अर्जदार महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहिवासी असावी. अर्जदाराने या किंवा शासनाकडील अन्य घरकुल योजनेचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराच्या कुटुंबातील कुणीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय नोकरीत नसावी. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराच्या स्वत:च्या नावे असणाऱ्या जागेचा ८अ उतारा असेसमेंट लिस्ट नुसार किमान क्षेत्रफळ २६९ चौ. फूट असावे. गावात अर्जदाराचे किंवा त्याच्या कुटुंबियांच्या नावे कोणतेही पक्के घर नसावे. अर्जदाराने पंचायत समिती स्तरावर विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. पंचायत समिती स्तरावरून प्राप्त झालेल्या पात्र अर्जदारांच्या यादीमधून लाभार्थी निवड सोडत (लकी ड्रॉ) पध्दतीने करण्यात येईल. प्रति लाभार्थी १ लाख २० हजार रूपये रक्कम देय आहे.

(२) दिव्यांग घरकुल योजना २०२३-२४ : ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींना घरबांधणीसाठी आर्थिक सहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**लाभार्थी पात्रता निकष** अर्जदाराचे दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असावे. अर्जदाराच्या कुटुंबाचे मागील आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न १ लाख रूपये च्या आत असावे. (कुटुंब :एकाच शिधापत्रिकेवरील नमूद लोकांचा गट ). अर्जदार महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहिवासी असावी. अर्जदाराने या किंवा शासनाकडील अन्य घरकुल योजनेचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराच्या कुटुंबातील कुणीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय नोकरीत नसावी. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जराच्या नावे असणाऱ्या जागेचा ८ अ उतारा असेसमेंट लिस्ट नुसार- किमान क्षेत्रफळ २६९ चौ.फूट असावे. पालकांच्या नावे जागा असेल तर संबंधितांचे संमतीपत्र आवश्यक. गावात अर्जदाराचे किंवा त्याच्या कुटुंबियांच्या नावे कोणतेही पक्के घर नसावे. अर्जदाराने पंचायत समिती स्तरावर विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. पंचायत सिमती स्तरावरून प्राप्त झालेल्या पात्र अर्जदारांच्या यादीमधून लाभार्थी निवड सोडत (लकी ड्रॉ) पद्धतीने करण्यात येईल. प्रति लाभार्थी १ लाख २० हजार रूपये रक्कम देय आहे. (३) स्वयंचलित तीन चाकी सायकल योजना २०२३-२४ : ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंचलित तीन चाकी सायकल घेणेसाठी आर्थिक सहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत प्रति लाभार्थी ४२ हजार रूपये प्रमाणे अनुदान देण्यात येते.

**लाभार्थी पात्रता निकष** अर्जदार अस्थिव्यंग असावा पण मतिमंद नसावा (किमान ६० टक्के पासून पुढचे दिव्यांगत्व आवश्यक). अर्जदाराचे वय हे १८ ते ५० या वयोगटातील असणे आवश्यक आहे. अर्जदाराच्या कुटुंबाचे मागील आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न १ लाख रूपये च्या आत असावे. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहिवासी असावी. अर्जदाराने या योजनेचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराच्या कुटुंबातील कुणीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय नोकरीत नसावी. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने पंचायत समिती स्तरावर विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. पंचायत सिमती स्तरावरुन प्राप्त झालेल्या पात्र अर्जदारांच्या यादीमधून लाभार्थी निवड सोडत (लकी ड्रॉ) पद्धतीने करण्यात येईल. अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या वैयक्तिक खातेवर प्रथमत: ५० टक्के व वस्तू खरेदीच्या मूळ पावत्या सादर केले नंतर उर्वरित ५० टक्के रक्कम वर्ग करण्यात येईल. अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या वैयक्तिक खात्यावर प्रथमत: ५० टक्के व वस्तू खरेदीच्या मूळ पावत्या सादर केल्यानंतर उर्वरित ५० टक्के रक्कम वर्ग करण्यात येते.

**(संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सांगली)**

पान १ वरुन

## शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण

घेऊन साक्ष पूर्ण झालेली आहे. आता पुढील कार्यवाही पूर्ण करून हे प्रकरण निकालासाठी बंद करण्याचे मी प्रस्तावित केले आहे. त्या अनुषंगाने सर्वांच्या सहकार्याने २० तारखेपर्यंत हे कार्य पूर्ण करायचा माझा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले.

शिवसेना ठाकरे गटाचे प्रतोद सुनीस प्रभू यांची उलट तपासणी शिंदे गटाचे वकील ॲड. महेश जेठमलानी यांनी घेतली. त्यावेळी ॲड. जेठमलानी यांनी सुनील प्रभूंना व्हीपच्या मुद्यावर घेरले. प्रभू यांनी व्हीप जारीच केला नाही हे ठरवण्याच्या अनुषंगाने प्रश्न केले. जेठमलानी यांच्या प्रश्नांवर प्रभू यांनीदेखील जोरदार पलटवार केला. ॲड. जेठमलानी यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या विधीमंडळ कार्यालयीन सचिव विजय जोशी यांचीदेखील साक्ष नोंदवली. तर, ठाकरे गटाकडून ॲड. देवदत्त कामत यांनी शिंदे गटाच्या आमदारांची उलट तपासणी केली. ॲड. कामत यांच्या उलट तपासणीत शिंदे गटाच्या आमदारांनी व्हीप मिळाला नसल्याचे म्हटले होते.

## तरुणांनी मांडलेल्या प्रश्नाची

उपस्थित लोकांना विचारायचे आहे, सरकार आपल्या मागण्यांकडे लक्ष देणार नसणार तर तुम्ही सर्व आमच्या सोबत विधिमंडळात चालणार का? दिल्ली समोर कधी महाराष्ट्र झुकला नाही. स्वाभिमानासाठी जे बोलतील त्यांनाच येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला पाठिंबा द्यायचा आहे. सभेनंतर सरकारकडून आपल्या मागण्यांची दखल घेण्यासाठी कोणी आले नाही, तर आपण सगळ्यांना विधिमंडळ कडे जायचे आहे.युवा संघर्ष यात्रा ही २४ ऑक्टोबरला पुणे येथून सुरू झाली. या यात्रेने १० जिल्हे, ३० तालुके आणि सुमारे ८०० किलोमीटरचे अंतर पार केले आहे. तरुणांचे विविध मुद्दे घेऊन निघालेली रोहित पवार यांची युवा संघर्ष यात्रेचा समारोप होत असताना त्यांचे आजोबा शरद पवार वाढदिवस असताना ही उपस्थित राहिले. राष्ट्रवादीतील फुटीनंतर रोहित पवार यांची ही यात्रा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचे एका प्रकारे नव्याने लौंचिंग मानलं जात आहे.

## विधिमंडळातील दोन दिवसांच्या

रुपयांच्या पुरवणी मागण्या आहेत. त्यापैकी १९ हजार २४४ कोटी ३४ लाख रुपयांच्या मागण्या अनिवार्य खर्चाच्या आहेत. कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या ३२ हजार ७९२ कोटी ८१ लाख रुपयांच्या मागण्या आहेत.

**केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या ३ हजार ४८३ कोटी ६२ लाखांची तरतूद** केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या ३ हजार ४८३ कोटी ६२ लाख रुपयांच्या मागण्या आहेत. केंद्राच्या ज्या योजना राज्यात सुरु आहेत, त्याला मॅचिंग ग्रँट देण्यासाठीचा हा खर्च आहे. याचा फायदा राज्यात पायाभूत सुविधांची निर्मिती आणि सर्वसामान्य घटकांपर्यंत विकासाची संधी पोहचविण्यासाठी होणार आहे.

**पिकविमा, कांदा उत्पादकांसाठी आर्थिक तरतुद** पुरवणी मागण्यातील महत्वाच्या तरतुदींबद्दल माहिती देतांना त्यांनी सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने नमो शेतकरी सन्मान निधी योजनेकरिता २ हजार १७५ कोटी २८ लाख, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या हप्त्यासाठी २ हजार ७६८ कोटी १२ लाख रुपये, शेतकऱ्यांना अल्प मुदतीच्या पीक पुरवठ्यासाठी २१८ कोटी, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेसाठी १०० कोटी रुपये, कांदा उत्पादकांना अनुदानासाठी ३०१ कोटी ६७ लाख रुपये, अशा तऱ्हेने कृषि क्षेत्रासाठी ५ हजार ५६३ कोटी ७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केलेल्या आहेत.

**जलजीवन मिशन, आदिवासी विकासासाठी तरतूद** जलजीवन मिशनसारख्या महत्वाकांक्षी योजनेसाठी ४ हजार २८३ कोटी रुपयांची पुरवणी मागणी आहे. आदिवासी विकासासाठी एकूण २ हजार ५८ कोटी १६ लाख रुपयांची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. राज्याच्या एकूण १ लाख ७२ हजार कोटी एवढ्या नियतव्ययाच्या तुलनेत आदिवासी क्षेत्रासाठी १५ हजार ९६६ कोटी एवढा नियतव्यय म्हणजेच ९.२८ टक्के आदिवासी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीत करुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच आदिवासी क्षेत्रासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. ओबीसी विभागासाठीही यावर्षी ७ हजार ८७३ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. ही सुद्धा आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**पुरवणी मागण्यांमध्ये उद्योगासाठी ३ हजार कोटी** राज्यात नवीन उद्योग यावेत यासाठी लघु, मध्यम व मोठ्या उद्योग घटकांना व विशाल प्रकल्पांना प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येते. यासाठी मूळ अर्थसंकल्पातील ३ हजार ३०० कोटी एवढ्या तरतुदीशिवाय ३ हजार कोटीची तरतूद पुरवणी मागणीच्या माध्यमातून केलेली आहे. महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदांच्या वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी ३ हजार कोटी रुपयांची पुरवणी मागणी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी २ हजार ७२८ कोटी १२ लाख रुपयांची पुरवणी मागणी आहे. केंद्र सरकारकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी ५० वर्षांच्या कालावधीसाठी बिनव्याजी कर्ज मिळते. त्यासाठी २ हजार ७१३ कोटी ५० लाखाची मागणी आहे. ओबीसी समाजासाठी मोदी आवास घरकुल योजना राबवतो आहोत. त्यासाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद आपण करीत आहोत. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यासाठी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. जिल्हा परिषद शिक्षकांचे वेतन, निराधारांसाठीच्या योजना, शिष्यवृत्ती, पोलीस गृहनिर्माण, महाज्योती, यंत्रमाग, वस्त्रोद्योग व कृषीपंप यांनी वीज दरात सवलत देण्यासाठी गृहनिर्माणासाठी, तरतुदी केल्या आहेत.

**कोकण क्षेत्र नियोजन प्राधिकरणासाठी टप्प्याटप्प्याने ५०० कोटी** कोकण क्षेत्र नियोजन विकास प्राधिकरण स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असून यासाठी बीज भांडवल म्हणून ५०० कोटी रुपयांचा निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. यासाठी सुरुवातीला आवश्यक असलेला निधी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये समाविष्ट असल्याचेही ते म्हणाले.

**राज्याच्या उत्पन्नाशी कर्जाचे प्रमाण** राज्याच्या उत्पन्नाशी कर्जाचे प्रमाण २०१३-१४ ला १६.३३ टक्के होते, २०२०-२१ ला १९.७६ टक्के होते, चालू वित्तीय वर्षात म्हणजे २०२३-२४ ला १८.२३ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. ती २५ टक्क्यांच्या मर्यादेतच असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. कल्याणकारी राज्याची संकल्पना आपण स्वीकारलेली आहे. राज्यातील गरीब, गरजू, पीडित, विकासात मागे राहिलेल्या वर्गाला सरकारकडून मदत झाली पाहिजे. त्याबरोबरच राज्यात ग्रामीण आणि शहरी भागात पायाभूत विकास झाला पाहिजे. कृषी क्षेत्राबरोबर सर्वच क्षेत्रात प्रगती झाली पाहिजे, अशी भावनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषणादरम्यान व्यक्त केली.

**महसूली तूट कमी करणार.** राज्याच्या अर्थसंकल्पात महसूली तूट नसावी असा संकेत आहे. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार १६ हजार १२२ कोटी ४१ लाख रुपयांची महसुली तूट अपेक्षित होती. जुलै २०२३ मधील पुरवणी मागण्यांमुळे महसूली तूट वाढून ४७ हजार ४८ कोटी रुपये झाली. डिसेंबर २०२३ च्या चालू अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमुळे महसूली तूट ८३ हजार ५५२ कोटी ३० लाख होण्याची शक्यता आहे. ज्या खर्चाच्या बाबींसाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली केलेली नव्हती किंवा अर्थसंकल्पीय तरतूद अपुरी होती अशा जलजीवन मिशन व इतर केंद्र पुरस्कृत योजनांचा परिपूर्ण लाभ घेण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे करावी लागलेली तरतूद, नमो कृषि महासन्मान योजना, एक रुपयात पीक विमा या शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक योजनांच्या अंमलबजावणीसाठी करावी लागलेली भरीव तरतूद तसेब बांधील खर्चाच्या बाबी व विकास कामांवरील खर्च यासाठी पुरवणी मागणीद्वारे तरतूद करणे आवश्यक ठरले आहे.

**उत्पन्नवाढ आणि खर्चात कपात करुन राजकोषीय तूटही कमी करणार** वित्तीय निर्देशांकानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी असली पाहिजे. सन २०२३-२४ मध्ये स्थूल राज्य उत्पन्न ३७ लाख ७९ हजार ७९२ कोटी रुपये अपेक्षित आहे. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राजकोषीय तूट ९५ हजार ५०० कोटी ८० लाख रुपये अपेक्षीत होती. (स्थूल राज्य उत्पन्नाच्या २.४६ टक्के) जुलै २०२३ मधील पुरवणी मागण्यांमुळे राजकोषीय तूट वाढून ती १ लाख ३१ हजार ३८४ कोटी ११ लाख रुपये इतकी झाली. (स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३.३९ टक्के). डिसेंबर २०२३ च्या चालू अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमुळे राजकोषीय तूट १ लाख ७९ हजार ७६८ कोटी ७७ लाख रुपये होण्याची शक्यता आहे. (स्थूल राज्य उत्पन्नाच्या ४.६३ टक्के)

राज्याच्या उत्पन्नाचा मर्यादीत स्रोत विचारात घेता, राज्याच्या बांधील खर्चासाठी व विकास कामांसाठी अतिरिक्त तरतूद करणे आवश्यक ठरते व त्यासाठी आवश्यकतेनुसार राज्य शासनास कर्ज काढावेच लागते. जुलै व डिसेंबर च्या अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमुळे अंदाजित राजकोषीय तूट वाढली असली तरी वर्ष अखरीस प्रत्यक्ष खर्चावर नियंत्रण ठेवून तसेच उत्पन्नाचे स्रोत वाढवून सदरची राजकोषीय तूट कमी करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. मागील तीन वर्षात वर्षअखेरीस राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या प्रमाणात तीन टक्के पेक्षा कमी ठेवण्यात यश आले आहे, असेही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या उत्तराचा समारोप करताना स्पष्ट केले.

## राज्य मागासवर्ग आयोगाची

न्यायाधीश जरांगे यांना अंतरवाली सराटी गावात भेटण्यासाठी गेले होते त्यामधे शुक्रे यांचा समावेश होता.

**कोणत्या तीन सदस्यांची नियुक्ती –** संजीव सानावणे यांच्या जाही मच्छिंद्रनाथ मल्हारी तांबे यांची सरकारने सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.लक्ष्मण हाके यांनीही सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागी सरकारने मारुती शिकारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बालाजी किल्लारीकर यांनी आरोप करत मागासवर्गी आयोगाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. राज्य सरकारने त्यांच्या जागी ओमप्रकाश शिवाजीराव जाधव यांची नियुक्ती केली आहे.

## सर्व संबंधित शासकीय विभागांनी

प्रधानमंत्री १५ कलमी कार्यक्रमा अंतर्गत अल्पसंख्याक युवकाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उन्नती व त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांच्या विभागामार्फत असलेल्या योजनांची माहिती पात्र अल्पसंख्याक लाभार्थ्यापर्यंत पोहोचवून त्यांना त्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या अडीअडचणी समजून त्यांच्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

विविध विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा अल्पसंख्याकांसाठी लाभ देण्याबाबत प्रत्येक विभागांनी निश्र्चित आराखडा तयार करावा व दरवर्षी किमान एक प्रकल्प कार्यान्वित होईल याबाबत योग्य कार्यवाही करावी. संबंधित विभागांनी त्यांना मंजूर असलेल्या निधीमधील १५% निधी अल्पसंख्याकांच्या योजना साठी राखून ठेवावा. व अल्पसंख्याकांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून एक ही पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी कांबळे यांनी दिले.

यावेळी शालेय शिक्षण, क्रीडा, समाज कल्याण उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग कौशल्य विकास, नगर विकास, सामाजिक न्याय विभाग यांनी जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजासाठी राबवलेल्या योजनांचा सविस्तर आढावा घेऊन श्री. कांबळे यांनी मार्गदर्शन सूचना दिल्या. यामध्ये शिक्षण विभागाने अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांची गळती रोखून शिष्यवृत्ती प्रकरणे मंजुरीसाठी करावेत. अल्पसंख्याकांच्या वस्तीमध्ये चांगले रस्ते, वीज व पाणी आदी मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. बेरोजगारांसाठी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून त्यांना रोजगार उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करावेत. पोलीस विभागाने जातीय सलोखा राखण्यासाठी सभा बैठका घेऊन मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही श्री. कांबळे यांनी दिल्या.

*जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा होणार-

दिनांक १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिन म्हणून प्रतिवर्षी साजरा केला जातो त्याप्रमाणे याही वर्षी जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी हा दिन साजरा केला जाणार आहे. या दिवशी अल्पसंख्यांकासाठी विविध योजना राबवणाऱ्या प्रत्येक विभागाने आपल्या विभागाची सविस्तर माहिती घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी श्री कांबळे यांनी केले.

## एकलव्य मॉडेल निवासी शाळेच्या..

वरील मजल्यावर सिध्देश्र्वर पेठ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्र. सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) श्री.पी.व्ही.परचाके, (मोबाईल क्रमांक.७३५०३२०२७६) येथे संपर्क साधावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री. गायकवाड यांनी केले आहे.

## देशात प्रथम क्रमांकाचे राज्य

बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र एक्सप्रेस वे अर्थात समृद्धी महामार्ग गेमचेंजर ठरला असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

मुंबई - पुणे हा बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतील महामार्ग केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रत्यक्षात साकारला. शिवडी - न्हावा शेवा - चिरले हे अंतर २० मिनिटांवर आले असून, कोस्टल रोड, वर्सोवा - मिरा भाईंदर, वसई -विरार - अलिबाग, मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई मेट्रो २ ते ७ आदी प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी माहिती दिली.

शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी हे सरकार उभे असून, गेल्या दीड वर्षात विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना हजारो कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. त्यामध्ये पूर्वीच्या दोन हेक्टर ऐवजी तीन हेक्टरपर्यंत नुकसान भरपाईसाठी वाढ करण्यात आली आहे. राज्यात नुकताच अवकाळी पाऊस, गारपीट झाल्यामुळे पिकांच्या नुकसान भरपाईसाठी तात्काळ पंचनामे करण्यात येत आहेत. केंद्र सरकारप्रमाणे शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेच्या माध्यमातून वार्षिक ६ हजार रुपये देणारे देशातील पहिलेच राज्य असल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले.

केंद्र शासनासोबत चांगले संबंध असल्यामुळे राज्याच्या विकासासाठी लागणारा निधी मिळत आहे. शासन आपल्या दारी उपक्रमातून आतापर्यंत १ कोटी ९० लाख नागरिकांना लाभ वितरित करण्यात आले. महिलांसाठी एस टी बस भाड्यात ५० टक्के सवलत, तसेच लेक लाडकी योजनेतून मुलीला तिच्या जन्मापासून १८ वर्षाची होईपर्यंत ७५ हजार रुपयांच्या निधीची मदत करण्यात येत आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्या सबलीकरणाचे धोरण राबविण्यात येत असल्याकडे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी लक्ष वेधले.

मराठा समाजाच्या मुलांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातून ५० हजार रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून दिला जात आहे. आतापर्यंत ७० हजार मुलांनी याचा लाभ घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## राज्यातील गृह विभागात दोन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### आय पी एस अधिकारी आशुतोष डुंबरे, यांची ठाण्याचे पोलीस आयुक्तपदी वर्णी.



मुंबई/विजय घनघाव :राज्यातील २ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश सोमवारी गृह विभागाने जारी केले आहेत. आयपीएस अधिकारी आशुतोष डुंबरे यांची ठाणे शहर पोलिस आयुक्त पदी वर्णी लागली आहे.आशुतोष डुंबरे राज्याच्या गुप्त वार्ता विभागात कार्यरत आहेत. डुंबरे यांच्या सोबत सध्याचे ठाण्याचे पोलिस आयुक्त जयजित सिंह यांची राज्याच्या महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई पदी बदली करण्यात आली आहे. आशुतोष डुंबरे पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील ओतूर या गावचे रहिवासी आहेत.आशुतोष डुंबरे यांनी ठाण्यात यापूर्वी अतिरिक्त पोलीसआयुक्त म्हणून जबाबदारी पार पाडली आहे.. आशुतोष डुंबरे १९९४ बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे आयपीएस अधिकारी असून त्यांची ठाणे शहर पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, ठाण्याचे पोलीस आयुक्त जयजीत सिंग यांचा दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असून त्यांना बढती मिळाली आहे. त्यामुळे ठाण्यालाही नवीन आयुक्त मिळाला आहे. डुंबरे हे राज्यात 'सुपर कॉप' म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी अनेक हायप्रोफाईल प्रकरण हाताळले आहेत. त्याचबरोबर त्यांनी ठाण्यातील बिल्डर सुरज परमार आत्महत्या प्रकरणही हाताळलं होतं..

# भिवंडी लोकसभेसाठी शरद पवार आग्रही, बाळ्या मामा असणार राष्ट्रवादीचे संभाव्य उमेदवार

भिवंडी :आगामी लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवारांनी आपली राजकीय रणनीती आखण्यास सुरुवात केली असून काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीने जाहीर केलेल्या संभाव्य लोकसभा मतदार संघांच्या यादीत भिवंडी लोकसभेवर पवारांनी दावा केला आहे.विशेष म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख असलेले सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा हे राष्ट्रवादीचे २०२४ चे संभाव्य उमेदवार असल्याची चर्चा सध्या भिवंडीत रंगली आहे.

सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या मुलीच्या लग्नाच्या स्वागत समारंभ प्रसंगी रविवारी शरद पवार भिवंडीत आले होते.पवारांनी बाळ्या मामा यांच्या परिवारासह नव दांपत्यांना शुभाशीर्वाद दिले.त्यानंतर शरद पवार व बाळ्या मामा यांच्यात बंद दाराआड काही वेळ चर्चा झाली.या चर्चे दरम्यान राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड देखील उपस्थित होते.बंद दाराआड झालेल्या या चर्चेत भिवंडी लोकसभा निवडणुकीबद्दल चर्चा झाल्याची माहिती बाळ्या मामा यांच्या निकटवर्तीयांकडून मिळाली आहे.राष्ट्रवादीने जाहीर केलेल्या दहा लोकसभांच्या यादीत भिवंडी लोकसभा राष्ट्रवादीकडे येणार असल्याने राष्ट्रवादीचे संभाव्य उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा हेच असणार असल्याची चर्चा भिवंडी लोकसभा मतदार संघात रंगली आहे.विशेष म्हणजे या स्वागत समारंभासाठी पवारांनंतर काही वेळाने राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी देखील हजेरी लावली.त्यामुळे पवार व बाळ्या मामा यांच्यातील बंद दाराआड झालेल्या गुप्त चर्चेबाबत वेगवेगळे तर्क वितर्क लावले जात आहेत.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीच्या ठाणे येथील जाहीर सभेत जितेंद्र आव्हाड यांनी सुरेश म्हात्रे यांचा उल्लेख, आमचा बाळ्या मामा असा केला होता.तेव्हापासून बाळ्या मामा राष्ट्रवादीसोबत जाणार असल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.



**भिवंडीत शरद पवार व बाळ्या मामा यांच्यात बंद दाराआड झालेल्या चर्चेने राजकीय वर्तुळात खळबळ**

दुसरीकडे भिवंडी लोकसभा नेहमीच काँग्रेसकडे राहिले आहे.मात्र सध्या भिवंडी लोकसभेत काँग्रेस पक्ष कमजोर असून फुटीरधोरणामुळे काँग्रेसने भिवंडी महापालिका देखील गमावली आहे.तर भिवंडी लोकसभेच्या सहाही विधानसभा मतदार संघात काँग्रेसचे अस्तित्व नाही.हा मतदारसंघ मुस्लिमबहुल मतदार संघ असल्याने केवळ मुस्लिम मतदारांच्या गणतीवरच काँग्रेस नेहमी भिवंडी लोकसभा मतदार संघावर आपला दावा करत आली आहे.मात्र २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला भिवंडीतून सतत अपयश येत असल्याने भिवंडी लोकसभेवर आता राष्ट्रवादीने दावा केला आहे.विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गट देखील भिवंडी लोकसभेसाठी शरद पवारांसोबत असल्याची चर्चा आहे.त्यामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने भिवंडी लोकसभेसाठी आपली मोर्चेबांधणी सुरु केली असून शरद पवारांनी खुद्द बाळ्या मामा यांना स्वागत समारंभानिमित्ताने भेट दिल्याने राष्ट्रवादीचे लोकसभेचे संभाव्य उमेदवार सुरेश म्हात्रे असल्याची चर्चा भिवंडी लोकसभेत रंगली आहे.

## पंढरपूरचा आवाज थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवला : अभिजीत पाटील

### पंढरपूर नगरपालिकेने जुलमी करवाढीच्या विरोधाचा अभिजीत पाटील आवाज उठवत पोचले थेट मुख्यमंत्रीपर्यंत

**दैनिक लोक सह्याद्री**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील यांनी पंढरपूरकराच्या प्रस्तावित जुलमी करवाढीच्या विरोधात मा. मुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे यांना सदरच्या करवाढीस स्थगिती मिळणेकामी पंढरपूरकरांच्या वतीने लेखी पत्राद्वारे निवेदन दिले.पंढरपूरातील सर्व पक्ष, सर्व संघटना यांनी नगरपरिषदेच्या या जुलमी करवाढीच्या विरोधात मा. मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर यांना नागरिकांच्या व्यथा लेखी स्वरूपात मांडून निवेदन देण्यात आले. तसेच पंढरपूरातील सुज्ञ नागरिकांनीही शहराच्या विविध भागामध्ये सह्यांची मोहिम राबवून पंढरपूर नगरपरिषदेने या प्रस्तावित केलेल्या जुलमी करवाढीच्या विरोधात निषेध नोंदविल्याचे दिसून आले.



पंढरपूर नगरपरिषदेने पंढरपूर शहरातील सर्व करपात्र मालमत्ता धारकांसाठी दि.९ नोव्हेंबर, २०२३ रोजी काही वृत्तपत्रांमधून जाहीर प्रसिध्दीकरण देऊन हरकती दाखल करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. यापूर्वी कोणतीही पूर्व कल्पना न देता अचानकपणे नगरपालिकेकडून मालमत्ता करवाढीची नोटीस पाठविली असल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. पंढरपूर नगरपरिषदेने आरोग्य, पाणी पुरवठा, शिक्षण, स्वच्छता, रस्ते अशा मुलभूत सुविधा नागरिकांना पुरविण्याचे कर्तव्य असताना देखील पंढरपूरातील उपनगरे व अनेक भागामध्ये अशा मुलभूत सुविधा सुरळीत दिलेल्या नाहीत, तरीदेखील आजतागायत नागरिक नगरपरिषदेचा कर 'भरत आहेत. असे असताना पंढरपूर नगरपरिषदेने चुकीच्या व बेकायदेशीर पध्दतीने कोणताही धोरणात्मक निर्णय न घेता खाजगी कंपनीद्वारे सव्र्व्हे करून भरमसाठ जुलमी करवाढ प्रस्तावित केलेली आहे. यापूर्वी पाणीपट्टी मध्ये बरीच वाढ केली असून लगेच घरपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करणे हे नागरिकांवर अन्यायकारक आहे.सदर करवाढीबाबत श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांनी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लेखी निवेदन दिले.

यावर सकारात्मक विचार करून लवकरच तोडगा काढण्याचे आश्र्वासन मुख्यमंत्री यांनी दिले.

## श्री वीरभद्र पोतदार आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित



दुधनी/ निंगप्पा निंबाळः सोलापूर-येथील पांचाळ सोनार समाज गौरव समिती सोलापूर तथा सोनार समाज संघटना सोलापूर यांचे वतीने दुधनी येथील सोलापूर २४ तास न्युज चॅनेलचे मुख्य संपादक श्री वीरभद्र पोतदार यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करून श्री अरुण राव पोतदार साहेब जी एस टी ऑफिसर मुंबई यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आला . पांचाळ सोनार समाजातील १०५ कर्तृत्ववान आणि लक्षवेधी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विविध सामाजिक बांधिलकी पुरस्काराने दिनांक १० डिसेंबर रोजी विजापूर रोड वरील निर्मिती लॉन्स येथे सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा. प्रा डॉ चंद्रकांत पोतदार कोल्हापूर , प्रमुख अतिथी कराड येथील प्रसिद्ध उद्योगपती श्री आनंदराव पालकर , तसेच उद्योगपती सर्वश्री भारत कारीकर सोलापूर , सुरेशराव पंडित कोल्हापूर / बार्शी , शंकरराव पोतदार अरग , अनिलभाऊ वाशिंबेकर करमाळा , कृष्णकुमार पोतदार पुणे ,अमोल महामुनी जेऊर , अविनाश पंडित उस्मानाबाद , संजयजी बानकर इंदापूर , संजय आष्टीकर , निलेशजी धाराशिवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री वीरभद्र पोतदार यांना आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले , श्री वीरभद्र पोतदार यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे .

## अमोगसिद्ध महाराज यात्रा मोठ्या उत्साहाने संपन्न

अक्कलकोट / गौतम बाळशंकरः विजापूर जिल्ह्यातील आरकेरी गुड या गावातील अमोगसिद्ध यात्रा मोठ्या उत्साहाने संपन्न झाली.अमोग सिद्धमहाराज मठातील मठाधिपती ,बनसिद्ध महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली, अमोगसिद्ध यात्रा, मोठ्या भक्ती भावाने साजरी केली जाते.

या यात्रेचे विशेषता महाराष्ट्र कर्नाटक तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यातील भक्त लाखोच्या संख्येने उपस्थित राहतात.या यात्रेमध्ये येणाऱ्या भाविकांना दासोहोच्या माध्यमातून, हजारो भक्त भोजनदान करतात, अमोगसिद्ध महाराज यांच्या भक्तीमय वातावरणामध्ये ही यात्रा मोठ्या उत्साहाने संपन्न झाली.



## शिक्षणानंतर माजी विद्यार्थ्यांचे आपापसातील नेटवर्किंग मजबूत असावे : इस्त्रोचे माजी शास्त्रज्ञ वसंत अवघडे

### पुण्यातील 'राष्ट्रसेवा दलाच्या फुले सभागृहात स्वेरीचा 'ऋणानुबंध २०२३' संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधीः 'महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर गुरु, शिष्य व मित्र यांच्या माध्यमातून आपापसातील व महाविद्यालयासोबतचे कॉन्टॅक्ट, कनेक्शन आणि नेटवर्किंग हे मजबूत असावेत तसेच शिकत असलेल्या इतर विद्यार्थ्यांनाही करिअरच्या दृष्टीने चांगला रस्ता मिळेल याचाही प्रयत्न माजी विद्यार्थ्यांनी केला तर खऱ्या अर्थाने स्वेरी मधून घेतलेल्या शिक्षणाबरोबरच संस्कार देखील आपण जपतो आहोत हे स्पष्ट होते.' असे प्रतिपादन सिडॅकचे जेष्ठ संचालक व इस्त्रोचे माजी शास्त्रज्ञ वसंत अवघडे यांनी केले.

पंढरपूरच्या स्वेरी अभियांत्रिकी व एमबीएच्या माजी विद्यार्थ्यांचा 'ऋणानुबंध २०२३-२४' हा मेळावा पुण्यातील 'राष्ट्रसेवादल भवन, पर्वती पायथा, सिंहगड रोड, मधील फुले सभागृहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिडॅकचे जेष्ठ संचालक व इस्त्रोचे माजी शास्त्रज्ञ वसंत अवघडे हे मार्गदर्शन करत होते. दिपप्रज्वलनानंतर सुमधुर स्वेरी गीताने कार्यक्रमाला सुरवात झाली. स्वेरी अभियांत्रिकीच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट चे अधिष्ठाता व माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव प्रा. ए. ए. मोटे यांनी पुण्यात मेळावा आयोजित करण्याचा हेतू सांगून माजी विद्यार्थी संघटनेच्या यशस्वी वाटचाली बद्धल माहिती सांगितली. या मेळाव्यात कोणी प्रशासकिय अधिकारी, कोणाची स्वतःची कंपनी, कोणी परदेशात स्थायिक, काही जण प्राध्यापक, कोणी उद्योजक, तर काहीजणी गृहिणी झाल्या होत्या.

हे सर्वच जण 'माजी विद्यार्थी मेळाव्या'च्या निमित्ताने फुले सभागृहामध्ये एकत्रित आले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना, वाटचाल व आजपर्यंतचा प्रवास त्याला स्वेरीमुळे आलेले यश हे सारे शब्दात सांगत होते. 'हार्ड वर्क' शिस्त व संस्कार या स्वेरीमधून मिळालेल्या शिदोरीमुळे आपण जीवनात यशस्वी होत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. ज्यावेळी कंपनीत नोकरीकरिता रुजू झालो त्यावेळी स्वेरीतून अंगीकारलेली शिस्त व प्राध्यापकांनी आमच्यावर केलेले अनमोल संस्कार याचा आज खूप फायदा होत आहे. त्यामुळे स्वेरीच्या अभ्यासपूरक वातावरणाला व काही जणांनी जागतिक स्तरावर रुजवलेल्या शिस्तीचा फायदा कसा होतो ? हे पटवून दिले. स्वेरीचे युवा विश्र्वस्त प्रा. सुरज रोंगे यांनी माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून करिअर डेव्हलपमेंटसाठी माजी विद्यार्थ्यांचा होणारा सपोर्ट या बाबी प्रामुख्याने नमूद केल्या. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, 'जिद्द, कठोर मेहनत आणि डिसिप्लीन याच्या माध्यमातून जीवनात यश कसे मिळवले जावू शकते' यावर प्रकाश टाकला. माजी विद्यार्थ्यांसमवेत त्यांनी मनमोकळेपणाने संवाद साधला. माजी विद्यार्थी संघटना विविध प्रकारे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी आणि स्वेरीच्या जडण घडणीत मोलाचा सहभाग नोंदवत आहेत. माजी विद्यार्थी स्वेरीला वेळोवेळी भेट देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात याचबरोबर विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळण्यासाठी मदत करतात. माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून टॉपर विद्यार्थ्यांना सुवर्णपदक दिले जाते व प्राध्यापकांना संशोधनासाठी निधी दिला जातो. अशा वेगवेगळ्या प्रकारे माजी विद्यार्थी संघटना कार्य करत आहे. यावेळी माजी विद्यार्थी तानाजी वलेकर, सुबोध डोळसे, सारंग रेवडकर, विश्र्वनाथ माळी, अश्र्विनी करपे, सतिश उमदी, प्रा.विक्रम मगर, दत्ता माळी, डॉ. प्रदीप जाधव, त्रिवेणी गायकवाड, भूषण शहाणे, साईनाथ वाघडकर, सागर पवार, सोनम जहागिरदार, दत्ता कांबळे, गायत्री अपसिंगकर, यांच्यासह काही माजी विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त करून भावना मांडल्या. यामध्ये अभियांत्रिकीच्या व एमबीए च्या स्थापनेपासून ते गतवर्षी उत्तीर्ण झालेले जवळपास ३५० हून अधिक विद्यार्थी, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, प्रशासन अधिष्ठाता डॉ.रणजित गिड्डे, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

माजी विद्यार्थी मेळाव्यात मनोगत सुरु असताना प्रोजेक्टच्या माध्यमातून स्थापनेपासून ते गत वर्षापर्यंतचे 'ऋणानुबंध' मेळाव्याची विशेष क्षणचित्रे दाखवली जात होती. हा मेळावा यशस्वी होण्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर स्वेरीच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर यांनी आभार मानले.

## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या (ईव्हीएम) जनजागृती व प्रात्याक्षिक मोहिमेचा जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

पुणे : लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा (ईव्हीएम मशीन) वापर होणार असल्याने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राबाबत जनजागृती आणि प्रात्याक्षिक मोहिमेचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, २१४ कँटोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे मतदान नोंदणी अधिकारी सिद्धार्थ भंडारे, २१३ हडपसर विधानसभा मतदार संघाचे मतदान नोंदणी अधिकारी विवेक जाधव, सहायक नगर रचनाकार तथा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे पथक प्रमुख प्रतीक डोळे आदी उपस्थित होते.



श्री. देशमुख यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या पथकाकडून यंत्राविषयी माहिती जाणून घेतली. ते म्हणाले, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रात जनजागृती व प्रात्याक्षिके चांगल्याप्रकारे करावीत. नागरिकांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र कसे काम करते हे समजावून सांगण्यासोबत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र नव्हे आपल्या मताचे बुलेटप्रूफ कवच आहे, हे यंत्र कोणत्याही हस्तक्षेपापासून अलिप्त, विनापरवाना अनधिकृत वापर ओळखण्याच्या तंत्रज्ञानाने आणि सांकेतिक लिपीबद्धतेच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असल्याबाबत माहिती द्यावी.

ईव्हीएम स्वतःची कार्यक्षमता आणि स्थिती स्वतःच ओळखण्याच्या क्षमतेने सुसज्ज व रेडिओ फ्रिक्वेन्सीच्या माध्यमातून माहितीच्या आदानप्रदानाबाबतीत अक्षम आहेत याबाबत नागरिकांना माहिती द्यावी. नागरिकांचे नोदवहीत अभिप्राय घेवून त्यांच्या शंका व प्रश्र्नांचे निरसन करावे, असेही त्यांनी सांगितले. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची जनजागृती व प्रात्याक्षिक मोहिम जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्राअंतर्गत गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठ, मॉल इत्यादी ठिकाणी २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सूरू राहणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी ईव्हीएम यंत्राच्या प्रात्याक्षिकाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. देशमुख यांनी यावेळी केले.